ठाणे महानगरपालिका, ठाणे
जा.क्र.ठामपा/आस्था/कार्मिक/उपआ(मु.)- २४ए७
दिनांक : २०/०८/२०१९

## - परिपत्रक -

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांस सन २०१९ मध्ये सणाची अग्रीम (खर्ची ) देणेबाबतचा निर्णय पुढील शर्तीवर घेण्यात येत आहे.

१) महापालिकेतील जे अधिकारी/कर्मचारी महापालिकेकडे अर्ज करुन गणपतीचे सणासाठी सणाच्या अग्रीमाची (खर्ची) मागणी करतील त्यांना गणपतीपुर्वी सणाची अग्रीम (खर्ची) रु.५०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार मात्र) अदा करण्यात यावी व सदरची रक्कम समान दहा हफ्त्यांमध्ये वसुल करण्यात यावी.

२) महापालिकेतील ज्या कर्मचा-यांच्या नेमणूका तात्पुरत्या कालावधीसाठी एकत्रित वेतन/ खाडाबदली/ रोजंदारीवर करण्यात आलेल्या आहेत त्यांना रु.१५००/- (अक्षरी रक्कम रुपये एक हजार पाचशे मात्र) सणाची अग्रीम (खर्ची) देण्यात यावी आणि सदरची रक्कम ५ समान हफ्त्यात वसुल करण्यात यावी.

३) जे अधिकारी/कर्मचारी सणाची अग्रीम (खर्ची) घेणेस इच्छुक नाहीत अशा अधिकारी/कर्मचारी यांनी आपले अर्ज खातेप्रमुखांमार्फत दि.२६/८/२०१९ पर्यंत आस्थापना शाखेकडे पाठवावेत.

४) सदर अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येणारी सणाची अग्रीम (खर्ची) वसुल करण्याची जबाबदारी संबंधीत विभागप्रमुखांवर राहील.

५) गणपतीपूर्वी सणाची अग्रीम (खर्ची) अदा करण्यासाठी सणाच्या अग्रीमाची (खर्चीची) बिले दि.२७/८/२०१९ पर्यंत लेखाशाखेकडे पाठवावीत.

(ओमप्रकाश दिवटे)
उपआयुक्त (मुख्यालय),
ठाणे महानगरपालिका, ठाणे

( मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने)

प्रत:- मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, सर्व गटनेता यांचेकडे माहितीसाठी सादर

स्विय सहाय्यक, मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त-१ व २ यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.

उपआयुक्त (मुख्यालय), सर्व विभाग व परिमंडळ यांजकडे माहितीसाठी

खातेप्रमुख (मुख्य आस्थापना विभाग, सर्व आस्थापना व लेखा शाखा प्रभाग कार्यालये, लेखापरिक्षण विभाग, छशिमरु/रागांवैम, आरोग्य विभाग, फायलेरीया विभाग, सर्व प्रभाग समिती कार्यालये, संगणक विभाग)

सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी